नि.फौ.ख. क्र.२२८/२०२१
सरकार वि. मयुर पवार
निशाणी २८

**अभियोग पक्षातर्फे सा.क्र. १**

| | | |
|---|---|---|
| **साक्षीदाराचे नाव** | :- | मयुरी मयुर पवार |
| पतीचे **पुर्ण नाव** | :- | मयुर जयवंतराव पवार |
| **वय** | :- | ३० वर्षे, |
| **व्यवसाय** | :- | घरकाम |
| **राहणार** | :- | चापानेर, ता.कन्नड जि. छ.संभाजीनगर |

**सरतपास शपथेवर सरकारी पक्षांमार्फत सरकारी वकील श्री. एन.एस.बडगुजर यांच्यामार्फत**

**१.** माझे लग्न दि.०२.०४.२०१६ रोजी आरोपी क्र.१ सोबत झाले होते. लग्नानंतर मी चापानेर येथे नांदायला गेले. तिथे आरोपी व आमच्यात किरकोळ वाद होते. असे काही घडले नाही की, लग्नानंतर मला ३ ते ४ महिने चांगले नांदविले, त्यानंतर माझे पती व सासरच्या लोकांनी संगनमत करुन मला घरातील काम येत नाही, स्वयंपाक येत नाही असे म्हणून टोचून बोलून शिवीगाळ करुन मारहाण केली. आता मला दाखविण्यात आलेल्या फिर्यादवर केवळ माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला काहीही माहीती नाही. सहीला **निशाण क्र.PW-1-29** देण्यात येते.

**साक्षीदार त्याच्या पुर्व कथनांशी विसंगत अशी साक्ष देत असल्यामुळे सरकारी वकील यांना उलटतपासात विचारण्यात येतील अशा स्वरुपाची प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर मला ३ ते ४ महिने चांगले नांदविले, त्यानंतर माझे पती व सासरच्या लोकांनी संगनमत करुन मला घरातील काम येत नाही, स्वयंपाक येत नाही असे म्हणून टोचून बोलून शिवीगाळ करुन मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत मी माझ्या आई-वडीलांना कळविले

होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझे आई-वडील चापानेर येथे येवून माझ्या सासरच्या लोकांशी समजूत घातली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर देखील सासरच्या लोकांनी वेळोवेळी घरगुती कारणावरुन उपाशी ठेवून घराबाहे काढून देवून मला क्रुर वागणूक देवून माझा शारिरीक व मानसिक छळ केला. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई-वडील व नातेवाईक त्यांची वेळोवेळी समजूत काढीत असे.

३. हे म्हणणे खरे नाही की, तरी देखील मला जास्तीचा त्रास झाल्याने मी व माझे पती दि.०५.०९.२०१७ रोजी कन्नड येथे राहण्यास आले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळीदेखील माझे सासरचे लोक कन्नड येथे येवून घरगुती कारणावरुन शिवीगाळ करुन मारहाण करीत असत. हे म्हणणे खरे नाही की, दि.०५.०३.२०२१ रोजी सासरे मयत झाल्यानंतर वरील सासरच्या लोकांनी मला तु येथे राहू नको, तु आण्णाप्रमाणेच आम्हाला खावून घेशील, असे म्हणून दि.११.०३.२०२१ रोजी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर दि.२५.०३.२०२१ रोजी मला घराबाहेर काढून दिले. हे म्हणणे खरे नाही की, दि.१४.०७.२०२१ रोजी कन्नड येथे महिला तक्रार निवारण केंद्र येथे वरील लोकांविरुध्द अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

४. आता मला दाखविण्यात आलेली तक्रार तीच असून त्यातील मजकूराबाबत मला माहिती नाही. पोलीसांनी त्यामध्ये असे का लिहून घेतले याचे कारण मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की, आरोपी व माझ्यात कोर्टाबाहेर तडजोड झालेली आहे. हे खरे आहे की, त्याप्रमाणे मी माझ्या पतीबरोबर नांदत आहे. त्यामुळे, मला याकामी पुढील साक्षीदार तपासचा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.आर.बी.सातदिवे यांनी नाकारला.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.03.12 17:45:33 +0530

**(वि. द. पाटील)**

दि.१२/०३/२०२६ **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

04:02:16 PM **कन्नड**

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Vishnu D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Court No.1, Kannad |
| Date | 12.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer | 12.03.2026 |
| Order uploaded on | 12.03.2026 |